**<u>जल जीवन मिशन अंतर्गत १०० दिवसांचे विशेष अभियान</u>**

**सर्व ग्रामीण अंगणवाडी केंद्रांना शुध्द पेयजल उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यपध्दती**

**महाराष्ट्र शासन**

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः जेजेएम-२०२०/प्र.क्र.११३/पापु ०७**

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
क्रॅाफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई
तारीख: नोव्हेंबर,२०२०

<u>वाचा-</u>

1. **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जजमि-२०१९/ प्र.क्र.१३८/ पापु १० (०७), दि.०४.०९.२०२०**
2. **पेयजल व स्वच्छता मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.११०११/५८/२०२०- JJM- दि.०१.१०.२०१२**

<u>प्रस्तावना-</u>

सन २००९-१० पासून सुरू असलेल्या केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची पुनर्रचना करुन सन २०१९ पासून जल जीवन मिशनची सुरवात करण्यात आली आहे. राज्यात जल जीवन मिशन राबविण्याकरीता संदर्भिय क्र.१ च्या पत्रान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण भागातील सर्व कुटूंबांना, शाळा, अंगणवाडीकेंद्रांना तसेच अन्य शासकीय संस्थांना वैयक्तिक नळ जोडणीद्वारे शाश्वत शुध्द पेयजल उपलब्ध करुन देण्यास शासन कटिबध्द आहे. त्याअनुषंगाने मा.पंतप्रधानांनी देशातील सर्व शाळा व अंगणवाडी केंद्रामध्ये नळद्वारे गुणवत्तापुर्ण पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्याकरीता दि.०२.१०.२०२० पासून १०० दिवसांच्या विशेष मोहिमेचा प्रारंभ केला आहे.

राज्यातील ४४९ ग्रामीण व आदिवासी एकात्मिक बाल विकास प्रकल्पांतर्गत कार्यरत ९३६७५ अंगणवाडी केंद्रांपैकी ५२२६९ अंगणवाडी केंद्रांना नळाद्वारे पाणी पुरवठा उपलब्ध नाही. अंगणवाडी केंद्रातील लहान मुले, गर्भवती स्त्रिया, स्तनदा माता, किशोरवयीन मुली यांच्या सुरक्षित आरोग्याच्यादृष्टीने २४ तास गुणवत्तापुर्ण पिण्याचे पाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने जल जीवन मिशन अंतर्गत सुरु करण्यात आलेल्या १०० दिवसांच्या विशेष मोहिमेद्वारे राज्यातील सर्व ग्रामीण अंगणवाडीकेंद्रांना गुणवत्तापुर्ण पेयजल उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय-**

जल जीवन मिशन अंतर्गत संदर्भिय क्र.१ च्या शासन निर्णयाद्वारे राज्यातील ग्रामीण भागातील कुटुंबासाठी नळाद्वारे गुणवत्तापुर्ण पेयजल पुरवठा करण्याचे निश्चित केले आहे. याच धर्तीवर ग्रामीण भागातील प्रत्येक अंगणवाडी केंद्रांना नळाद्वारे गुणवत्तापुर्ण पेयजल उपलब्ध करुन देण्याकरीता खालीलप्रमाणे कार्यपध्दती विषद करण्यात येत आहे.

१. ज्या अंगणवाडी केंद्रांना नळाद्वारे पाणी पुरवठा उपलब्ध नाही अशा अंगणवाडी केंद्रांना संबंधित अंगणवाडी पर्यवेक्षिका व कनिष्ठ अभियंता, सर्व शिक्षा अभियान यांनी व्यक्तिश: भेट देऊन पाणी पुरवठा उपलब्ध करण्याविषयी सविस्तर लेखी मागणीपत्र व अंदाजपत्रक तयार करावे.

२. याबाबतचा प्रस्ताव त्यांनी संबंधित उप अभियंता, सर्व शिक्षा अभियान यांचेकडे तांत्रिक मान्यतेस सादर करावा.

३. तांत्रिक मान्यतेनंतर संबंधित अंगणवाडी पर्यवेक्षिका व कनिष्ठ अभियंता, सर्व शिक्षा अभियान यांनी सदर प्रस्ताव संबंधित ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय मान्यतेस सादर करावा.

४. उपरोक्त प्रशासकीय मान्यता प्राप्त करण्यापर्यंतची कार्यवाही हा शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून ३० दिवसांच्या आत पुर्ण करण्यात यावी.

०२. सदर शंभर दिवसांच्या अभियानातील लक्ष्य साध्य करण्याकरीता स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन पुढील प्रमाणे कालबध्द कार्यवाही करण्यात यावी.

| अ. क्र | स्थानिक परिस्थिती | कार्यवाही | योजना मंजुरी कार्यपध्दती | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | अंगणवाडी परिसरामध्ये हातपंप/बोअरवेल उपलब्ध आहे/तसेच पुरेशा बारमाही पाण्याची उपलब्धता आहे. | • अंगणवाडयांना शाश्वत पाणी पुरवठ्यासाठी पुरेशा नळ जोडण्या देण्यात याव्यात. भूजल पातळीनुसार वीजेवर/ सौर उर्जेवर आधारित सबमर्सिबल पंप्स स्थापित करण्यात यावेत. | १.उप अभियंता, सर्व शिक्षा अभियान, शिक्षण विभाग यांचेद्वारे तांत्रिक मान्यता.<br>२.ग्रामपंचायतीद्वारे प्रशासकीय मान्यता<br>३. सर्व शिक्षा अभियान, शिक्षण | • ५ दिवस<br>• ३ दिवस<br>• ७ दिवस |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | • विरळ वाडया-वस्त्या, डोंगराळ/ वन/ आदिवासी भागातील वस्त्यांमध्ये सौर उर्जेवर आधारित स्वतंत्र पाणी पुरवठा व्यवस्था स्थापित करावी. | विभाग यांना राज्य पाणी व स्वच्छता मिशन मार्फत योजनेच्या अंमलबजावणीकरीता निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.<br><br>४. कनिष्ठ अभियंता व उप अभियंता, सर्व शिक्षण अभियान, शिक्षण विभाग यांनी संपुर्ण योजनेची अंमलबजावणीकरुन योजना कार्यान्वित करणे | • ४५ दिवस |
| २. | सदर गावामध्ये पाणीपुरवठा योजना आहे तथापि अंतर, भौगोलिक परिस्थिती, निधी उपलब्धता/ इ. कारणांमुळे अंगणवाडीमध्ये पाणी पुरवठा उपलब्ध नाही. | ग्रामपंचायतीद्वारे अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनेतून नळ पाणी पुरवठा तसेच पुरेसे नळ कनेक्शनस उपलब्ध करण्यात यावेत. | १.उप अभियंता, सर्व शिक्षा अभियान, शिक्षण विभाग यांचेद्वारे तांत्रिक मान्यता.<br><br>२.ग्रामपंचायतीद्वारे प्रशासकीय मान्यता<br><br>३. सर्व शिक्षा अभियान, शिक्षण विभाग यांना राज्य पाणी व स्वच्छता मिशन मार्फत योजनेच्या अंमलबजावणीकरीता निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.<br><br>४. कनिष्ठ अभियंता व उप अभियंता, सर्व शिक्षण अभियान, शिक्षण विभाग यांनी संपुर्ण योजनेची अंमलबजावणीकरुन योजना कार्यान्वित करणे | • ५ दिवस<br><br>• ३ दिवस<br><br>• ७ दिवस<br><br>• ४५ दिवस |
| ३. | अंगणवाडीला नळाद्वारे पाणी उपलब्ध आहे. तथापि शाश्वत पाणी पुरवठ्यासाठी त्यामध्ये | या कामांसाठी रेट्रोफिटींग (सुधारणात्मक पुनर्जोडणी) करुन पाणी पुरवठा उपल्ब्ध करण्यात यावा. | १.उप अभियंता, सर्व शिक्षा अभियान, शिक्षण विभाग यांचेद्वारे तांत्रिक मान्यता.<br><br>२.ग्रामपंचायतीद्वारे प्रशासकीय | • ५ दिवस<br><br>• ३ दिवस |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सुधारणा करणे गरजेचे आहे. | | मान्यता<br><br>३. सर्व शिक्षा अभियान, शिक्षण विभाग यांना राज्य पाणी व स्वच्छता मिशन मार्फत योजनेच्या अंमलबजावणीकरीता निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.<br><br>४. कनिष्ठ अभियंता व उप अभियंता, सर्व शिक्षण अभियान, शिक्षण विभाग यांनी संपुर्ण योजनेची अंमलबजावणीकरुन योजना कार्यान्वित करणे | • ७ दिवस<br><br>• ४५ दिवस |
| ४. | अंगणवाडी परिसरामध्ये हातपंप/बोअरवेल उपलब्ध आहे तथापि हंगामी स्वरूपात किंवा कमी प्रमाणात पाणी उपलब्ध आहे. | असे प्रस्ताव संबंधित जिल्हा परिषदांच्या कार्यकारी अभियंत्यांकडे बोअरवेलच्या यथायोग्य स्थळनिश्चितीकरीता किंवा अन्य उपाययोजनेकरीता संदर्भित करण्यात यावेत. | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषदेमार्फत उपयोजना प्रस्तावित करुन जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्यात येईल. | ----- |

०३. अंगणवाडी केंद्र शासकीय संस्था असल्याकारणाने या पाणी पुरवठा योजनेवरील देखभाल दुरुस्ती/ वीज बील/ अन्य आवर्ती खर्च आदिवासी भागातील ग्रामपंचायतींनी ५% पेसा निधीतून तर अन्य ग्रामपंचायतींनी १०% महिला व बालविकास निधीतून भागवावा.

०३. या योजनांचे भौतिक व आर्थिक संनियंत्रण, मालमत्तेचे संनियंत्रण जल जीवन मिशन आयएमआयएस(IMIS) प्रणालीद्वारे करण्यात येईल. अशाप्रकारे संनियंत्रणाची व नियमित लेखापरिक्षणाची जबाबदारी संबंधित जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनची राहील.

०४. सदर तदतुदी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

०५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक......................... असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(डॉ.संजय चहांदे)**
अपर मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा.मंत्री ( पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई-३२
३. मा. राज्यमंत्री पाणीपुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव मंत्रालय मुंबई
४. मा. मंत्री ( सर्व )यांचे खाजगी सचिव मंत्रालय मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता विधानसभा महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय मुंबई
६. मा. विरोधी पक्षनेता विधान परिषद महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय मुंबई
७. मा. विधानसभा विधानपरिषद सदस्य सर्व महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय मुंबई
८. मा. मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव मंत्रालय मुंबई
९. मा. अपर मुख्य सचिव ( पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग )/ शालेय शिक्षण /महिला व बाल विकास विभाग
१०. संजालक जल जीवन मिशन/राजमाता जिजाऊ पोषण अभियान/सर्व शिक्षा अभियान
११.सदस्य सचिव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई
१२. संचालक भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा पुणे
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सर्व
१४. सह/ उपसचिव / विशेष कार्य अधिकारी सर्व पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग मुंबई
१५. संचालक पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था बेलापूर नवी मुंबई
१६. उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता /बाव विकास अधिकारी /शिक्षण अधिकारी / कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा परिषद सर्व

१८.वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा सर्व

१९. अवर सचिव / कार्यासन अधिकारी (सर्व) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
मंत्रालय,मुंबई.

२०.निवड नस्ती पापु ०७ पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई